प्रेस नोट दिनांक - १८/०७/२०१८

---

**विशाल ऊर्फ जंगल्या सातपुते टोळीतील नामचीत तडीपार गुंड तसेच सारसबाग चौपाटी येथे घडलेल्या जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या टोळीतील एक महीन्यापासुन फरार आरोपीस पकडण्यास खडक पोलीसांना यश**

---

दिनांक १८/०७/२०१८ रोजी खडक पोलीस ठाणे कडील सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव पवार, पोलीस हवालदार विनोद जाधव, पोलीस शिपाई रवि लोखंडे, पोलीस शिपाई अशिष चव्हाण असे खडक पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना पोलीस शिपाई आशीष चव्हाण यांना त्याचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, इसम अजिंक्य शिंदे, रा. लोहीयानगर हा स्वारगेट पोलीस ठाणे कडील एका हाफ मर्डरच्या गुन्हयात फरारी असुन तो आत्ता सध्या पी.एम.सी.कॉलनी नं. ०९, घोरपडे पेठ, पुणे येथे येणार आहे अशी गोपनीय माहिती प्राप्त होताच सदर बाबत वरिष्ठांना कळवुन वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांचे मार्गदशर्नखाली पोलीस हवालदार विनोद जाधव, पोलीस शिपाई रवि लोखंडे, पोलीस शिपाई अशिष चव्हाण सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन मिळालेल्या बातमीतील वरील इसमास घेराव घालून त्यास आाज रोजी १४.३० वा. चे सुमारास ताब्यात घेतले. त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अजिंक्य सुरेश शिंदे, वय २२ वर्षे रा. ७४/एच्. पी./२०१, लोहियानगर, पुणे असे असलेचे सांगितले. त्यास विश्वासात घेवुन तपास करता त्याने त्याचे साथीदारांसह सुमारे १ महिन्यापुर्वी सारसबाग चौपाटी येथे मुलगा विकास गोविंद कांबळे यास मारहाण केली असल्याचे सांगितले.

सदर बाबत अधिक चौकशी करता स्वारगेट पोलीस ठाणेस गु. र. नं. २००/२०१८ भा.द. वि. कलम ३०७,१४३, १४४, १४७, १४८, १४९, आर्म ॲक्ट ४ सह २७, ७०४, फौजदारी कायदा दुसरी सुधारणा १९८३ कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल असुन तो सदर गुन्हयात पाहिजे आरोपी आहे.

सदर ताब्यात घेतलेला तडीपार इसम अजिंक्य सुरेश शिंदे यास मा. डॉ. बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १, पुणे शहर यांचे आदेशावये पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून एक वर्षाकरीता तडीपार करणेत आलेले असून त्याचेवर मु.पो.का. कायदा १४२ प्रमाणे कार्यवाही करुन पुढील कार्यवाहीची तजवीज ठेवली आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे मा. पोलीस उपायुक्त डॉ. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस ठाणे पुणे चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. वैभव पवार व पोलीस हवालदार विनोद जाधव,पो.ना. लोहोमकर,पो. ना. सरडे, पोलीस शिपाई रवि लोखंडे, पोलीस शिपाई अशिष चव्हाण यांनी केलेली आहे.